INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालयाचे योगदान

**प्रा. डॉ. पी.एस. सोनवणे**
संशोधक मार्गदर्शक व प्राचार्य
श्रीमती वि. उ. पाटील कला व कै. डॉ.भा.स.
देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे

**दुर्गेश मोतीलाल खैरनार**
संशोधक विद्यार्थी
क.ब.चौ.उ.म. विद्यापीठ जळगाव

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2021-29289225/IRJHIS2109020

***सारांश :***

*इतिहासाचार्य वि. का. राजवाडे हे श्रेष्ठ इतिहास संशोधनकार आणि लेखक होते. त्यांनी इतिहासाच्या लेखनासाठी अपार कष्ट सहन करून अस्सल साधने संकलित केली. यासाधनांच्या सहाय्याने मराठ्यांच्या इतिहासाची साधने प्रसिद्ध केली. यासाठी तंजावर ते काबूल असा प्रवास केला. पुराभिलेख, पुरातत्वशास्त्र, भाषाशास्त्र, अर्वाचीन साहित्य, व्युत्पत्तीशास्त्र यांचा त्यांना गहन अभ्यास होता. २६ वर्षांच्या वास्तव्यानंतर त्यांचा ३१ डिसेंबर १९२६ रोजी धुळे येथे मृत्यू झाला. इतिहास आणि संलग्न शास्त्रांतील त्यांचे प्रचंड कार्य अविरत सुरू असावे म्हणून ९ जानेवारी १९२७ रोजी त्यांच्या नावाने **'इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ'** या संस्थेची स्थापना करण्यात आली. तसेच याचवेळी **'इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालयाची'** स्थापना करण्यात आली.*

***शोधसंज्ञा :*** *राजवाडे, वाचनालय, ग्रंथ, वाचक*

**प्रस्तावना :**

शब्द, ग्रंथ आणि ग्रंथालयांचे महत्तव अनन्यसाधारण आहे. ग्रंथ हे गुरू होत आणि ते उत्तम संस्कार देतात. म्हणून ग्रंथांना आयुष्यभर पुरणारी ग्रंथाची शिदोरी म्हटले जाते. चांगल्या ग्रंथाचे वाचन नेहमी हितवाह ठरते. सार्वजनिक ग्रंथालय हे सुजाण व सुसंस्कृत नागरिक तयार करण्याचे सांस्कृतिक केंद्र आहे. ग्रंथालय समाजविकासाचे एक महत्त्वचे साधन आहे. त्यामुळे ग्रंथालयांना राष्ट्राची संपत्ती मानली जाते. सुरूवातीला गवताच्या छपरात, झोपडीत किंवा एखाद्या लहान खोलीत सुरू झालेली ग्रंथालये आज भव्य

दिव्य इमारतीत आहे. आज ती नुसती भौतिक साधनानेच संपन्न झालेली नाहीत तर विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक उपक्रम राबवून त्यांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचे ग्रंथालय हे सुद्धा आपले एक वेगळेच अस्तित्व राखून आहे.

**उद्दिष्टे :**

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालयाच्या ऐतिहासिक वाटचालीचा थोडक्यात आढावा घेणे.

**गृहितके :**

१.ग्रंथालयाच्या स्थापनेत असणाऱ्या व्यक्तींचे योगदान माहिती होते.

२.ग्रंथालयातील वाचकवर्ग व वाचनसाहित्य यांची माहिती होते.

३.ग्रंथालयाच्या वाटचालीशी निगडीत आर्थिक बाबींची माहिती होते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**वाचनालयाची स्थापना :**

प्रत्येक संशोधन संस्थेचे भूषण म्हणजे त्या संस्थेतील संशोधकाचे संशोधन कार्य व संस्थेजवळील समृद्ध ग्रंथालय होय. इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालय हे यातील एक आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आपल्या आयुष्याच्या अखेरीस धुळे शहरात वास्तव्यास होते. खरं तर मंडळाच्या ग्रंथालयाला राजवाड्यांच्या साहित्य संग्रह व लिखाणातूनच सुरूवात झाली आहे. संशोधन मंडळाची स्थापना ९ जानेवारी १९२७ रोजी झाली. सुरूवातीला ग्रंथालय खाजगी जागेत सुरू करण्यात आले होते. नंतर इ. स. १९३२ मध्ये नवीन इमारत बांधून त्यात हलविण्यात आले. त्यावेळेस धुळे येथील तात्यासाहेब भटांच्या निवासस्थानी असलेले दुर्मिळ पुस्तके, कागदपदत्रे आणि हस्तलिखितांची दप्तरे या अद्यावत इमारतींत हलविण्यात आलीत. तसेच संशोधक व वाचकांसाठी उपयुक्त असे भा. वा. भट संदर्भ ग्रंथालय स्थापन करण्यात आले. यात सुमारे ५ हजारांपेक्षाही अधिक संदर्भ ग्रंथ आहेत.

**ग्रंथालय इमारत :**

ग्रंथालयास ब्रिटिशकालीन पुरातन वास्तू मिळाली आहे. ही वास्तू पूर्णत: दगडी असून पुरातन काळातील वास्तूशिल्पाचा एक देखनीय नमुना आहे. या वास्तूत लाकडाचा उपयोग न करता बनविण्यात आली आहे. सदर वास्तू दुमजली आहे आणि त्यामुळे ग्रंथालयाच्या विविध विभागांकरिता तिचा वापर होत आहे. ग्रंथालय व इतर इमारतीचे मिळून १६७४ चौ. मी. बांधलेले क्षेत्रफळ आहे.

**ग्रंथालय सभासद :**

ग्रंथालय शहरातील पुरातन ग्रंथालय असल्याने तसेच शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने ग्रंथालयास स्थापनेपासून मोठ्या संख्येने सुशिक्षित वाचक लाभले आहेत. ग्रंथालयाचे ८०० पेक्षा जास्त सभासद आहेत. ग्रंथालय सभासदांमध्ये बाल वाचक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे तरूण वर्ग ग्रंथालयाचा संशोधनासाठी वापर करीत आहेत. ग्रंथालय आपल्या नियमित वाचकांसाठी विविध विषयांची, त्यांचया आवडीची ग्रंथ खरेदी करते. वाचकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यात स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम, विविध स्पर्धा, लहान मुलांसाठी संस्कार शिबीर, महिलांसाठी पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आयोजित केल्या जातात. ग्रंथालय दरवर्षी वाचकांच्या पसंतीनुसार दिवाळी अंक मागवित असते. नाममात्र शुल्कात वाचकांना १५० ते २०० दिवाळी अंकांची मेजवाणी ग्रंथालय दिपावलीस देत असते.

**ग्रंथालयातील ग्रंथसंपदा :**

ग्रंथालय हे पुरातन असल्याने ग्रंथालयात अनेक दुर्मिळ अमुल्य ग्रंथाचे जतन केले आहे. ग्रंथालयात मार्च २०२० अखेर एकूण ग्रंथसंपदा २६४६७ इतकी आहे. या ग्रंथसंपदेत ग्रंथालयाने दूर्मिळ ग्रंथाबरोबर कथा, कादंबरी, ललित, चरित्र, धार्मिक, ज्योतिष, पर्यावरण, संदर्भ, शिक्षण अशा नानाविध ग्रंथांचे संग्रह केले आहे. ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी तसेच संस्कृत भाषेचेही ग्रंथ आहेत. ग्रंथालयास राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानाकडून प्राप्त ग्रंथाचाही समावेश आहे. तसेच दानशूर व्यक्तीकडून प्राप्त ग्रंथांमुळेही ग्रंथसंपदेत भर पडत आहे.

**वर्तमानपत्रे :**

ग्रंथालयात मुक्तद्वार वाचनालयात दररोज २३ वर्तमानपत्रे येतात. तसेच सायंकाळी ६ सायंदैनिके येतात.

**मासिके :**

ग्रंथालयात वाचकांच्या पसंतीनुसार २४ साप्ताहिके, ५७ मासिके, २ पाक्षिके, २ त्रैमासिक येतात.

**ग्रंथालय सेवा :**

ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वर्गाच्या वाचकांकरिता सेवा देण्याचे कार्य ग्रंथालय अविरत सुरू आहे. ग्रंथालय वाचकांना त्यांना हवे ते माहिती स्त्रोत पुरविण्याकरिता तत्पर असते. ग्रंथालयातील वाचकांकरीता ग्रंथालय संदर्भसेवा देत असते. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानाकडून प्राप्त झेरॉक्स यंत्राने ग्रंथालय वाचकांना आवश्यक झेरॉक्स सेवा पुरवित आहे. ग्रंथालय वाचकांकरिता सुटीच्या दिवशीही मुक्तद्वार

वाचनालयातील पेपर रिडींग हॉल खुला असतो.

**आधुनिकतेकडे वाटचाल :**

बदलत्या काळानुसार ग्रंथालयाने नवनविन तंत्रज्ञानाचा वापर करून वाचकांना सेवा जलद गतीने पुरविण्याकरीता आंतरिक बदल करण्यात सुरूवात केली आहे. सर्व ग्रंथाची नोंद संगणकात करण्यात आली आहे. त्यामुळे वाचकांना हवा तो ग्रंथ तत्काळ मिळू शकतो. मा. आमदारांकडून ग्रंथालयास संगणक व प्रिंटर प्राप्त झाले आहे. त्याचा वापर ग्रंथालयाने आधुनिकीकरणासाठी केला आहे. संशोधन मंडळाचे स्वत:चे असे मराठी व इंग्रजी भाषेतील संकेतस्थळ आहे.

**संशोधन मंडळाचे मान्यवर अध्यक्ष :**

संशोधन मंडळाबरोबर ग्रंथालय हे एकाच व्यवस्थापनाखाली चालते. या मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा आजवर शंकर देव, नारायण चाफेकर, सरदार माधवराव किबे, डॉ. रघुवीरसिंग, माधवराव श्रीहरी अणे, डॉ. चिंतामणी देशमुख, आदींनी सांभाळली आहे. राजवाडेंचे काम अखंडित सुरू राहावे आणि अभ्यासक, सामान्य जनतेला पुरातन माहिती मिळत राहावी या उद्देशाने स्थापन झालेल्या मंडळाला आर्थिक अडचणींना सामोरे लागत होते. सुरूवातीला राजवाडे को-ऑप. बँकेची स्थापना केली होती. त्यामुळे या बँकेच्या माध्यमातून आर्थिक मदत होत गेली. तथापि अनेक गैरप्रकारांमुळे बँक बुडाली. त्यामुळे मंडळाचा आर्थिक स्त्रोत बंद झाला आहे. आता मंडळापुढे प्राचीन वस्तू, साहित्य जतन करताना ग्रंथालय चालविण्याचे आव्हान आहे. त्यातही ते वेगवेगळ्या माध्यमातून मदत मिळवून चालविण्याचा प्रयत्न आहे. ग्रंथालय संचालनालयाचे अनुदान हा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे.

**पुरस्कार :**

इतिहास संशोधनाचे उत्कृष्ट कार्य करणारी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाला सन २०१७ चा पुरूषोत्तम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील शिक्षण, संशोधन व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थेला हा पुरस्कार देण्यात येतो.

**समारोप :**

धुळे जिल्ह्याचे वैभव तालुका 'अ' दर्जा असलेले 'इतिहासाचार्य वि. का. संशोधन मंडळाचे ग्रंथालय हे जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत अमूल्य असे योगदान दिले. प्रचंड ग्रंथसंपदा, नियमित वाचकवर्ग, अभ्यासू संचालक मंडळ, कार्यतत्पर कर्मचारी तसेच दानशूर व्यक्तीच्या दिलेल्या योगदानामुळे ग्रंथालयाचा नावलौकिक तसेच ग्रंथालय चळवळ उत्तरोत्तर वाढतच जाणार यात शंकाच नाही.

**संदर्भ सूची :**


१. यथार्थ, मराठी भाषा गौरव दिन, डिजिटल ई साप्ताहिक, ४ मार्च २०१८, पृ २८

२. वार्षिक अहवाल, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालय, धुळे, २०१९-२०.

३. माहिती पुस्तीका, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालय, धुळे, २००८

४. स्मृति शलाका, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालय, धुळे, १९९२